# प्रेसनोट दिनांक २७/०३/२०१९

**खडक पोलीस स्टेशन पुणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे- गणेश सतिष जाधव वय- २० वर्षे रा. साई मदिराचे समोर, राजीव गांधी पतसंस्थेच्या पाठीमागे, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे. हा पुणे पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रातुन एक (१) वर्षाकरीता तडीपार**

मा. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा. शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांनी आगामी लोकसभा निवडणूक २०१९ व विधानसभा निवडणूक २०१९ च्या काळात पुणे शहरात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणारे टोळीचा/गुन्हेगारांचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे गुन्हे अभिलेखावरील सराईत व अटट्ल गुन्हेगार नामे- **गणेश सतिष जाधव वय- २० वर्षे रा. साई मदिराचे समोर, राजीव गांधी पतसंस्थेच्या पाठीमागे, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे.** याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन येथे घरफोडी, दरोडयाची तयारी व बेकायदेशीर जमाव जमवून जातीय तेढ निर्माण करणे यासारखे एकूण ३ गुन्हे दाखल आहेत. या पैकी घरफोडीच्या गुन्ह्यात मा.न्यायालयाने सन २०१८ मध्ये त्यास ८ महिणे कैदीची शिक्षा सुनावली आहे.शिक्षा भोगुन बाहेर आल्यानंतरही त्याचे वर्तवणुकीत काही एक सुधारणा झाली नाही व त्याने आपले गुन्हेगारी,बेकायदेशीर कृत्य चालुच ठेवली होती.

नमुद तडीपार नामे- **गणेश सतिष जाधव वय- २० वर्षे रा. साई मदिराचे समोर, राजीव गांधी पतसंस्थेच्या पाठीमागे, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे.** याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता. त्याचे गुन्हेगारी कृत्यामुळे परिसरामधील नागरीकांचे मालमत्तेचे नुकसान होवुन धोका निर्मान झाला होता. तडीपार इसमाचे बेकायदेशीर कृत्यामुळे सन २०१८ साली काशेवाडी भागात गणपती उत्सव काळात दोन गटामध्ये वाद निर्माण झालेला होता. सर्वसामान्य नागरीकांना लुटून, चो-या, घरफोडी करून तो आपला गुन्हेगारी हेतु साध्य करीत आहे. व त्यातुन मिळणारे पैशातुन ऐषोरामी जीवन जगत होता. त्याने या भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली होती, त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नव्हते. त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांचे मनात भिती निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. म्हणुन त्यास **पुणे शहर आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन हद्दपार करण्या बाबतचा प्रस्ताव श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ पुणे शहर यांचेकडे पाठविण्यात आला होता, त्यानुसार त्यांनी त्यास पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातुन एक वर्षाकरीता तडीपार केलेले आहे.**

अशा प्रकारे आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूक, सण व उत्सव काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये या अनुषंगाने पोलीसांकडुन समाजकंटक व अटट्ल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीसांनी दिले आहेत.

सदर कारवाई फरासखाना विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रदिप आफळे, यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. उत्तम चक्रे, पोलीस उप निरीक्षक रत्नदीप गायकवाड, महेश बारवकर, महेश कांबळे, दिपक मोधे यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक ★ खडक पोलीस ठाणे, पुणे ★

(राजेंन्द्र मोकाशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन पुणे